# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 18.09.2026** **वार : शुक्रवार**

---

## ठळक बातम्या

1. जागतिक उत्पादन क्षेत्रात नव्या आव्हानांना सामोरे जाणारं विश्वासार्ह केंद्र म्हणून भारताची ओळख असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.
2. देशभरात स्वच्छता ही सेवा उपक्रमाचा प्रारंभ.
3. हिंदुस्थान एअरोनॉटिक्स आज स्वदेशी बनावटींच्या विमान आणि हेलिकॉप्टर हवाई दलाकडे सुपूर्द करणार.
4. पुरूषांच्या तीन टी-20 क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत भारत अजिंक्य.

## सविस्तर बातम्या

**सेमीकॉन**

सेमीकंडक्टर उद्योगासाठी जागतिक केंद्र होण्याच्या दिशेनं भारत आवश्यक ती सर्व पावले उचलत असून, या क्षेत्रात नवोन्मेष, गुंतवणूक आणि विकासाच्या नव्या संधी निर्माण होत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत केलं. त्यांच्या हस्ते सेमिकॉन इंडिया परिषदेचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. जागतिक उत्पादन क्षेत्रातील नव्या आव्हानांना सामोरं जाणारं विश्वासार्ह केंद्र म्हणून भारताची ओळख असल्याचं ही त्यांनी नमूद केलं. आतापर्यंत 12 सेमिकंडक्टर चिप निर्मिती प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून, पुढील टप्प्यात ही संख्या आणखी वाढेल, असंही त्यांनी सांगितलं.

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते मुंबई, लोणावळा आणि पुण्यात विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. दुपारी ते कैवल्यधामच्या गोवर्धनदास सेक्सारिया कॉलेज ऑफ योग अँड कल्चरल सिंथेसिसच्या अमृतमहोत्सवी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर संध्याकाळी पुण्यात आयोजित पुणे फेस्टिव्हलला प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित राहतील. त्यानंतर संध्याकाळी उपराष्ट्रपती दिल्लीकडे रवाना होतील.

**'सेवासंकल्प-मेक इन इंडिया'**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील कारकिर्दीला 25 वर्ष पूर्ण होत असल्याच्या औचित्यानं 17 ऑक्टोबरपर्यन्त सेवा संकल्प अभियान राबवण्यात येत आहे. या विशेष 'सेवा संकल्प अभियान' मालिकेत आपण 'मेक इन इंडिया' उपक्रमाद्वारे उत्पादन आणि रोजगार या क्षेत्रात भारतानं केलेल्या कामगिरीचा आढावा घेणार आहोत.

'मेक इन इंडिया' या 2014 मध्ये सुरू झालेल्या उपक्रमाचा उद्देश लालफितीचा कारभार कमी करणे, व्यवसाय सुलभता सुधारणे, गुंतवणूक आकर्षित करणे आणि देशांतर्गत क्षमता विकसित करून भारताला उत्पादनासाठी एक स्पर्धात्मक केंद्र बनवणे हा होता. या उपक्रमाचा दृष्टिकोन केवळ स्वतंत्र कारखान्यांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण मूल्य साखळी विकसित करण्यापर्यंत विस्तारला. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचे मूल्य 2025-26 मध्ये 13 लाख 11 हजार कोटी रुपयांवर पोहोचले, तर इलेक्ट्रॉनिक्स

क्षेत्रातील निर्यातीचा आकडा 4 लाख 24 हजार कोटी रुपयांवर गेला. मोबाईल फोनच्या निर्यातीत 171 पटींनी वाढ झाली आणि भारत 'निव्वळ आयातदार' श्रेणीतून 'निव्वळ निर्यातदार' या श्रेणीत आला. पीएलआय अंतर्गत समाविष्ट असलेल्या 14 क्षेत्रांमध्ये मार्च 2026 पर्यंत 2 लाख 40 हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक झाली आणि 14 लाखांहून अधिक रोजगार निर्माण झाले. 'मेक इन इंडिया'मुळे 'मेड इन इंडिया' ही केवळ एक लेबल न राहता जागतिक स्तरावरील उत्पादनाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य बनत आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून सविता म्हसकर.

**<u>महा-सेवा संकल्प</u>**

समाजाची मानसिकता बदलण्याच्या दृष्टीनं, विकलांग ऐवजी दिव्यांग या शब्दाचा वापर करण्यात पंतप्रधानांची दूरदृष्टी दिसून येते. असं प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी काल केलं. मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. दिव्यांग व्यक्तींविषयी केवळ सहानुभूती व्यक्त करण्याऐवजी त्यांना समान संधी उपलब्ध करून देणे ही समाजाची जबाबदारी असल्याचं वर्मा म्हणाले.

**<u>चिराग पासवान</u>**

अन्नप्रक्रिया क्षेत्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य मूल्य, उद्योजकांना उभारी आणि ग्रामीण भागातील कुटुंबांना स्वावलंबनाची नवी दिशा मिळत असल्याचं मत केंद्रीय अन्नप्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान यांनी काल ठाणे इथं केलं. केंद्रीय अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या वतीनं 'सेवा संकल्प अभियान' आणि 'सेवा दिवस' या उपक्रमांतर्गत काल ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात योजित 'आशीर्वाद का दिया' कार्यक्रमात ते बोलत होते.

**<u>स्वच्छता सेवा</u>**

जगभरातल्या भारतीय आणि वाणिज्य दूतावासांनी काल स्वच्छता ही सेवा या उपक्रमाचा प्रारंभ केला. मोहिमेचे प्रमुखांनी त्यांच्या अधिकाऱ्यांना स्वच्छतेची शपथ दिली आणि त्यांच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. अझरबैजान, आइसलँड, लायबेरिया येथील भारतीय दूतावास तर सौदी अरेबिया, टांझानिया राष्ट्रांतील वाणिज्य दूतावासांमध्ये मोहिमेचा प्रारंभ झाला. दिल्लीत परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांच्या उपस्थितीत परराष्ट्र मंत्रालयाच्या मुख्यालयात या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

**<u>अर्थमंत्री</u>**

प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळं लघु उद्योजकांना कोणत्याही तारण-हमीशिवाय कर्ज मिळवणं शक्य झालं, असं मत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केलं. त्या काल नवी दिल्लीत  या योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधताना बोलत  होत्या. 2015 मध्ये सुरू झालेल्या या योजनेअंतर्गत वेळेवर कर्जाची परतफेड केल्यामुळं लाभार्थ्यांना अधिक रकमेचं कर्ज मिळवणं, आपली पत-स्थिती सुधारणं आणि बँकांचा विश्वास संपादन करणं शक्य झालं आहे,असंही अर्थमंत्री यावेळी म्हणाल्या.

**<u>राज्यवित्तीय परिषद</u>**

दिल्लीत आजपासून विकसित भारताच्या प्रवासात वित्तपुरवठा या विषयावरील दोन दिवसांच्या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री आणि अर्थसचिव यांच्यासह केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि अनेक राज्यांचे मुख्यमंत्रीही परिषदेला उपस्थित राहाणार आहेत.

**<u>राष्ट्रीय चाचणी</u>**

राष्ट्रीय चाचणी संस्थेनं इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या तीन विषयांसाठी घेण्यात आलेल्या युजीसी नेट जून 2026 परीक्षेच्या अंतिम उत्तरतालिका जाहीर केल्या आहेत. या उत्तरतालिका युजीसीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिल्या आहेत. ही परीक्षा 9 आणि 10 जून रोजी घेण्यात आली होती.

**<u>पासपोर्ट सुधारणा नियम</u>**

परराष्ट्र मंत्रालयानं, पारपत्र अर्थात पासपोर्ट सुधारणा नियम जाहीर केले आहेत. त्या नुसार पंधरा वर्षांखालील मुलांना जारी केलेले 36 पानी पारपत्र पाच वर्षांसाठी किंवा मूल अठरा वर्ष पूर्ण होईपर्यंत, यापैकी जो कालावधी आधी पूर्ण होईल तोपर्यंत वैध राहणार आहे.

**<u>एचएएल</u>**

हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड म्हणजेच एचएएल आज बंगळुरू इथं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत, स्वदेशी बनावटीचे हलके लढाऊ विमान, दोन व्यक्तींच्या क्षमतेचं तेजस विमान आणि एचटीटी- 40 हे प्राथणिक प्रशिक्षण विमान भारतीय हवाई दलाकडे सुपूर्द करणार आहे. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम असलेल्या पवन हंस लिमिटेडकडे ध्रुव चे अत्याधुनिक हेलिकॉप्टरही सुपूर्द करणार आहे.

**<u>डॉ. एस. जयशंकर</u>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल थिम्पू इथं भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्येल वांगचुक यांची भेट घेतली. भारत आणि भूतान यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ करण्याबाबत भूतानच्या राजांचं मार्गदर्शन मोलाचं आहे,असं डॉ. जयशंकर यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>उर्जा अमेरिका</u>**

भारतातल्या 140 अब्ज नागारकांसाठी ऊर्जा महत्त्वाची धोरणात्मक गरज आहे आणि तोच राष्ट्रविकासाचा पाया आहे. त्यामुळे भारतीय जनतेच्या ऊर्जा सुरक्षेला सर्वोच्च प्राथमिकता असल्याचं ठाम प्रतिपादन अमेरिकेतली भारतीय राजदूत विनय मोहन क्वात्रा यांनी काल केलं. भारतीय ऊर्जा गरजांविषयी समाज माध्यमांवरून प्रसारित संदेश मालिकेत त्यांनी, भारत हा उर्जेचा तिसरा सर्वांत मोठा ग्राहक आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

**<u>टाटा सन्स</u>**

टाटा सन्स उद्योग समूहानं एन. चंद्रशेखरन यांची कार्यकारी अध्यक्ष म्हणून पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी फेरनियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचा सध्याचा कार्यकाळ 20 फेब्रुवारी 2027 रोजी संपणार होता. चंद्रशेखरन यांच्या फेरनियुक्तीच्या बातमीमुळं शेअर बाजारात टाटा समूहाच्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी वाढ झाली.

**<u>रशिया-धीरज सेठ</u>**

लष्करप्रमुख धीरज शेठ यांनी तीन दिवसांच्या रशिया दौऱ्यात रशियन भूदल मुख्यालयाला भेट दिली. या भेटीदरम्यान दोन्ही देशांच्या लष्कराच्या क्षमता विकासाला बळकटी देण्यावरही त्यांनी भर दिला.

**<u>नकाराधिकार वापर</u>**

इराणच्या अणूकार्यक्रमावर इराण आणि चीन यांनी गेल्या वर्षी लागू करण्यात आलेल्या निर्बंधांवर देखरेख ठेवण्यासंदर्भातील एका ठरावावर व्हेटो म्हणजेच नकाराधिकार दिला आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या तज्ज्ञांना देखरेखीसाठी अधिकृत मान्यता मिळणार नाही. इराणवर संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे निर्बंध अजूनही लागू आहेत.

**<u>पश्चिम बंगाल</u>**

पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या आगामी विधानसभा पोटनिवडणुकामध्ये, राष्ट्रीय निवडणूक आयोगाने तृणमूल काँग्रेसच्या दोन प्रतिस्पर्धी गटांना पक्षाचे नाव आणि फुले आणि गवत हे चिन्ह न वापरण्याचे निर्देश दिले आहेत.ममता बॅनर्जी आणि अरूप रॉय यांच्या नेतृत्वाखाली पक्षांच्या दोन्ही गटांच्या नेत्यांचे स्पष्टीकरण ऐकल्यानंतर निवडणूक आयोगाने अंतरिम आदेश काढले.

**<u>क्रिकेट</u>**

क्रिकेटमध्ये पुरुषांचा संघ काल अफगाणिस्तानविरूद्धच्या आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात भारतानं 127 धावांनी दणदणीत विजय मिळवत मालिका खिशात घातली. भारतानं 20 षटकांत दिलेल्या 222 धावांचे लक्ष्य पूर्ण करताना अफगाणिस्तानचा डाव 94 धावांतच आटोपला. पुरुषांच्या टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यात 100 हून अधिक धावांच्या फरकाने भारतानं 10 वा विजय नोंदवला आहे. अभिषेक शर्माला कालच्या सामन्याचा सामनावीर आणि मालिकावीर म्हणून घोषित कऱण्यात आलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.